




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४








■ वर्ष ७५ वे/अंक १५७ वा ■ ■ अमरावती, शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर १० माघ १९४६ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■







# दावोस मध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला

## महाराष्ट्र भविष्यात डेटा सेंटरचे कॅपिटल : मुख्यमंत्री



दावोस दि. २३ : दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमीक फोरमच्या भारताच्या पॅव्हेलियनमध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला राहीला. यामुळे महाराष्ट्राला जगभरातील विविध उद्योग क्षेत्रातील दिग्गज कंपन्यासमवेत विक्रमी १५ लाख ७५ हजार कोटी रुपयांचे गुंतवणूकीचे सामंजस्य करार करता आले. यातून राज्यात १५ लाख ९८ हजार रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच दावोसमधील इकॉनॉमी फोरममध्ये सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या जनतेचेही आभार मानले. दावोसमध्ये गुंतवणूकीचे ५४ आणि धोरणात्मक सहकार्याचे ७ असे एकूण ६१ सामजंस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

महाराष्ट्र आता डेटा सेंटरचे कॅपिटल होईल. डेटा हे नव्या युगाचे 'ऑईल' आहे. त्यामुळे या क्षेत्राची वाढ वेगाने होईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

स्वित्झर्लंडमधील दावोस येथून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आज पत्रकारांशी दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. उद्योग मंत्री उदय सामंत मुंबई येथून सहभागी झाले.

सुरवातीलाच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जयंती निमित्त अभिवादन केले. तसेच दावोस मध्ये वर्ल्ड इकॉनॉमीक फोरममध्ये देशातील अन्य सहा राज्यांसमवेत सहभागी होण्याची संधी (उर्वरित पान २ वर)

## ॲड. प्रविण पाटील यांची उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्तीपदी निवड



नवी दिल्ली दि. २३ : अमरावती येथील ज्येष्ठ विधिज्ञ स्व. ॲड. एस. झेड पाटील यांचे सुपूत्र ॲड. प्रविण शेषराव पाटील यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्तीपदी निवड करण्यात आली आहे. गुरुवारी भारत सरकारने अधिसूचना काढून त्यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले.

सोमवार दि. २७ जानेवारी रोजी मुंबई उच्च न्यायालयात त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे हे नवनियुक्त न्यायमुर्ती प्रविण पाटील यांना शपथ देतील. ॲड. प्रविण पाटील यांची उच्च न्यायालयाच्या न्यायमुतीपदी निवड झाल्याबद्दल अमरावतीसह विदर्भातील वकील क्षेत्रात आनंद व्यक्त केल्या जात आहे.

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर होणार वक्फ दुरुस्ती विधेयक, जेपीसीचा अहवाल अंतिम टप्प्यात

नवी दिल्ली दि. २३ : संसदेत मांडण्यापूर्वी वक्फ दुरुस्ती विधेयक संयुक्त संसदीय समिती, म्हणजेच गझउ कडे पाठवण्यात आले होते. गझउ ने या विधेयकवार दीर्घ चर्चा केली असून, येत्या २७-२८ जानेवारी रोजी आपला अहवाल लोकसभा अध्यक्षांना सादर केला जाऊ शकतो. लोकसभा अध्यक्षांच्या मंजुरीनंतर हा अहवाल येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकसभेत मांडला जाणार आहे. या अहवालाच्या मसुद्याला अंतिम रूप देण्यासाठी सलग दोन दिवस जेपीसीच्या बैठका बोलावण्यात आल्या आहेत. ही बैठक उद्या(२४ जानेवारी) सकाळी ११ वाजता सुरू होणार आहे.

समितीच्या बैठका सलग शुक्रवार आणि शनिवारी (उद्या आणि परवा) बोलावण्यात आल्या आहेत. या बैठकीत विधेयकावर दीर्घ चर्चा होऊन अहवालाच्या मसुद्याला अंतिम स्वरूप दिले जाईल. जेपीसी सदस्यांना २२ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत या मसुद्यात दुरुस्ती करण्यासाठी वेळ देण्यात आला होता. या विधेयकात समाविष्ट करण्यासाठी अनेक दुरुस्त्या समितीला मिळाल्या आहेत, त्या दुरुस्त्यांवरही दोन दिवसीय बैठकीत चर्चा होणार असून आवश्यक वाटल्यास मतदानही होणार आहे.

दरम्यान, लोकसभेने वक्फ (दुरुस्ती) (उर्वरित पान २ वर)

## काँग्रेसने नाना पटोलेंचा राजीनामा स्वीकारला?

### नवीन प्रदेशाध्यक्ष सोमवारी ठरणार



मुंबई दि. २३ : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीला बहुमत मिळाले. तर महाविकास आघाडीचा सुफडासाफ झाला. महायुतीने २३० जागांवर विजय मिळाला. तर महाविकासआघाडीला केवळ ४६ जागांवर समाधान मानावे लागेल. राज्यात फक्त १६ जागांवर काँग्रेसचे उमेदवार निवडून (पान २ वर)

## बाळासाहेब ठाकरे यांना 'भारतरत्न' द्या संजय राऊत यांची पंतप्रधानांकडे मागणी



मुंबई दि. २३ : शिवसेनाप्रमुख स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आज जन्मदिवस. बाळासाहेब ठाकरे आज आपल्यासोबत नाहीत. त्यांनी हिंदू म्हणून अभिमानानं जगण्याचा मंत्र दिला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर बाळासाहेबांनी महाराष्ट्राच्या जनतेला ताठ मानाने जगायला शिकवलं. बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न मिळायला पाहिजे, अशी मागणी खासदार संजय राऊत यांनी केली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी ही मागणी केलीय.

हिंदुहृदयसम्राट (पान २ वर)

माहोल....




स्नान करायला थोडीच जात आहे मी कुंभमेळ्यात, मी तर फेमस व्हायला जात आहे!!

## मशिदींवरील भोंग्यांच्या याचिकेवर हायकोर्टाचा ऐतिहासिक निकाल; न्यायालयाकडून कार्यपद्धती स्पष्ट

मुंबई दि. २३ : राज्यातील मशिदींवर असलेल्या बेकायदेशीर भोंग्याबाबत सातत्याने तक्रारी केल्या जातात. मात्र, केवळ तेवढ्या पुरताच हा मुद्दा विचारात घेतला जातो. या तक्रारींची दखलही तात्पुरत्या स्वरुपातच घेतली जाते, त्यानंतर काही दिवसांतच पुन्हा हे भोंगे वाजले जातात. न्यायालयाने घालून दिलेल्या डेसिबलच्या मर्यादेचं उल्लंघन करत मशिंदीवरील भोंगे वाजले जातात. पहाटेच्या सुमारास वाजणाऱ्या या भोंग्यांचा त्रास सर्वच समुदायातील नागरिकांना होतो. त्याच अनुषंगाने दाखल याचिकेवर आज उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी झाली. त्यावर, न्यायालयाने पोलिसांना स्पष्ट शब्दात निर्देश देत राज्य सरकारलाही सुनावले आहे. याचिकेवर सुनावणी करताना आता हायकोर्टाने ध्वनिप्रदूषणाशी संबंधित तक्रारी हाताळत कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्पष्ट कार्यपद्धती निश्चित केली आहे. दरम्यान, मनसेकडूनही सातत्याने हा मुद्दा (उर्वरित पान २ वर)

















